Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## - :: परिपत्रक :: -

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २३ (क) मधील तरतूदींनुसार आणि मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांनी पत्र क्रमांक युएनआय/(१३२/१८)/अधी.३/विशि-१/१९०१४ दिनांक १७/११/२०१८ च्या पत्राद्वारे शासन पत्र क्र. परिनि-२०१८/प्र.क्र.८२/विशि-२, दिनांक ३०/१०/२०१८ च्या पत्रासोबत पाठविणेत आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम २०१८ (क्रमांक १) च्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मध्ये संचालक, विद्यार्थी विकास या पदावर मा. कुलगुरू यांच्यामार्फत नामनिर्देशन करावयाचे आहे.

एकरूप परिनियम २०१८, क्रमांक १ नुसार संचालक, विद्यार्थी विकास या पदाकरीता वित्तलब्धी, वय, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात आल्या असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २३ (क) मधील तरतूदींनुसार सदर पदाकरीता अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षांचा अनुभव असणाऱ्या, अभ्यासेतर व विस्तार कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून मा. कुलगुरू यांचेद्वारे नामनिर्देशित करण्याकरीता इच्छुक पात्र अध्यापकांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सोबत एकरूप परिनियमाची प्रत माहितीसाठी जोडण्यात येत आहे.

इच्छुक पात्र अध्यापकांनी दिनांक १३/०८/२०२४ ते २१/०८/२०२४ या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in येथील Recruitments या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. सदर अर्जाची हार्ड कॉपी (Hard Copy) आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसहित दि. २३/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावे विद्यापीठ कार्यालयास पोष्टाने अथवा स्व:हस्ते सादर करावी. ऑनलाईन पध्दतीने विहित नमून्यामध्ये भरलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. अपुरे अथवा आवश्यक कागदपत्राशिवाय केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अंतिम दिनांकानंतर केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

जा.क्र.शिवाजी वि./आस्थापना पी.जी./3715
दिनांक :- 12 AUG 2024

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी -
शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था आणि विद्यापीठ अधिविभाग.